**<u>ई-फायलींग</u>**

MHAU080005562026

## <u>दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १३४/२०२६ मध्ये निशाणी क्र.१ वरील आदेश</u>

*(लक्ष्मण व इतर वि. महाराष्ट्र शासन)*

अर्जदार यांनी सदरचा अर्ज महाराष्ट्र रेग्युलेशन कायदा, १८२७, खंड ८ अन्वये वारसाचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. अर्जदारांचे थोडक्यात कथन असे की, मयत नामे यशोदाबाई लक्ष्मणराव आहिरे यांचे दि. १८/१२/२०२३ रोजी मौजे सिल्लोड येथे निधन झालेले आहे. मयत यशोदाबाई लक्ष्मणराव आहिरे यांचे आई–वडीलांचे यापूर्वीच निधन झालेले आहे.

३. मयत यशोदाबाई लक्ष्मणराव आहिरे यांची अर्जदार क्र. १ हे पती, अर्जदार क्र. २ व ३ ही मुले आणि अर्जदार क्र. ४ ते ६ या मुली आहेत. अर्जदारांव्यतिरीक्त मयत यशोदाबाई लक्ष्मणराव आहिरे यांना इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

४. अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने त्यांनी प्रस्तूत अर्ज दाखल करुन तो मंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

५. प्रस्तुत प्रकरणात गैरअर्जदार यांचेवर नि.क्र. ०९ खाली नोटीसची बजावणी होऊन देखील त्यांचे तर्फे कोणीही हजर झाले नाही. तरी देखील प्रस्तूत प्रकरणाची जनतेस माहिती व्हावी करीता दि. १२/०३/२०२६ रोजीची जाहीर नोटीस नगर परिषद कार्यालय, सिल्लोड येथील कार्यालयाच्या फलकावर नि.क्र. ०८ खालील बेलिफ रिपोर्ट प्रमाणे प्रसिध्द करण्यात आली. तसेच सदर जाहीर नोटीस अर्जदार यांनी दैनिक वर्तमानपत्र "दै. आनंद नगरी" दि. ०८/०३/२०२६ रोजीच्या अंकात प्रसिध्द केली असता कोणताही आक्षेप आजपावेतो आलेला नाही.

६. करीता, पुढील प्रश्न माझ्या विचारार्थ येतात, त्यावर मी खालीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवित आहे.

| <u>अ. क्र.</u> | <u>प्रश्न</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| १. | अर्जदार हे मागणी केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत काय ? | होय. |
| २. | आदेश काय ? | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>प्रश्न क्र. १ करीता</u> –**

**७.** अर्ज व त्यातील कथने शाबीत करण्यासाठी अर्जदारांनी अर्जदार क्र. ३ व ६ यांना अनुक्रमे नि.क्र. १० व ११ वर तपासले. ज्या मजकुराचा अर्जात उल्लेख आहे, तसा मजकूर अर्जदार यांनी त्यांच्या पुराव्यात पुन्हा कथन केलेला आहे. अर्जदार यांनी अर्जाच्या कथनाच्या पुष्ठ्यर्थ मयत यशोदाबाई लक्ष्मणराव आहिरे यांचे मृत्यू दाखल्याची प्रत, अर्जदारांच्या आधारकार्डच्या छायांकीत प्रती, दिनांक ०८/०३/२०२६ रोजीचे न्यायालयाचे जाहीर प्रगटन प्रसिध्द केलेल्या दैनिक "दै. आनंद नगरी" च्या आवृत्तीची प्रत इ. दस्त (नि.क्र. ४ व ६) खाली दाखल केले आहेत. तसेच नि.क्र. ०८ खाली बेलिफ यांचा प्रसिध्दी अहवाल दाखल केलेला आहे.

**८.** अर्जदार यांच्यातर्फे देण्यात आलेला तोंडी व कागदोपत्री पुरावा एकमेकास पुरक असून तो अबाधित आहे. तसेच त्यांनी प्रस्तुत अर्जाच्या कथनाच्या पुष्ठ्यर्थ जाहीर प्रगटन (नि.क्र. ०७) दिल्यानंतर त्याबाबत कोणीही आक्षेप नोंदविलेला नाही. वरील चर्चेवरुन मयत यशोदाबाई लक्ष्मणराव आहिरे यांचे अर्जदार हे वारस आहेत असा निष्कर्ष काढण्यात येत आहे. अशा परिस्थितीत सदर वारस प्रमाणपत्र अर्जदार यांचे नावे देणे उचित होईल. सबब, प्रश्न क्र.१ चा निष्कर्ष मी होकारार्थी नोंदवितो.

**<u>प्रश्न क्र. २ करीता</u> –**

**९.** अर्जदार यांनी मागणी केल्याप्रमाणे अर्जदार हे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत असा निष्कर्ष मी, वर उल्लेख केल्याप्रमाणे नोंदविलेला आहे.

**१०.** भारतीय वारसा कायदा, १९२५ चे कलम ३९० अन्वये बॉम्बे रेग्युलेशन कायदा अंतर्गत देण्यात येणाऱ्या प्रमाणपत्रास भारतीय वारसा कायदा, १९२५ चे कलम ३९० लागू असून त्या अन्वये कोर्ट फी कायदा अन्वये योग्य तो मुद्रांक लावणे आवश्यक असल्याबाबत तरतूद आहे. त्याप्रमाणे बॉम्बे रेग्युलेशन अन्वये देण्यात येणाऱ्या प्रमाणपत्रास देखील महाराष्ट्र कोर्ट फी कायदा लागू असल्याने अर्जदार क्र. १ ते ६ हे महाराष्ट्र कोर्ट फी

कायद्याचे परिशिष्ट क्र.१ चे आर्टीकल १२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे आर्टीकल १० व ११ अन्वये न्यायालयीन मुद्रांक भरणे आवश्यक व जरुरीचे आहे. परिणामतः हा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. म्हणून मी, प्रश्न क्र.२ च्या उत्तरार्थ खालील आदेश पारित करीत आहे.

**आ दे श**

१. अर्ज मंजूर करण्यात आला.

२. अर्जदार क्र. १ ते ६ यांना बॉम्बे रेग्युलेशन तरतुदींचे अपेंडीक्स 'ब' प्रमाणे **मयत यशोदाबाई लक्ष्मणराव आहिरे** यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत दाखला **केवळ अर्जात नमूद कारणांसाठी** देण्यात यावा.

३. वारस प्रमाणपत्र निर्गमित करण्याकरिता अर्जदार यांनी योग्य ते न्यायालयीन मुद्रांक शुल्क न्यायालयात जमा करावे.

Digitally signed by KAILAS TRYAMBAK ADHAYKE
Date: 2026.07.20 15:35:00 +0530

सिल्लोड. (के. टी. अढायके)
दिनांक – १३/०७/२०२६ सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, सिल्लोड.